राष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण

…AHARASHTRA HOUSING AND
…EA DEVELOPMENT AUTHORITY

MHADA

जा.क्र. प्राधि/उपाध्यक्ष/1215 /
दिनांक 09/09/2020

| उमुअ/इपक (बृ.क्षे.)प्रआयो/प्रा. | |
|---|---|
| आवक क्र. | दिनांक |
| 9-423 | 09 SEP 2020 |
| | |

परिपत्रक

**विषय** : अभिन्यास मंजूरी कक्ष व इमारत परवानगी कक्ष या कार्यालयांच्या कामकाजाबाबत

**संदर्भ** : मा. मंत्री, गृहनिर्माण यांचे समवेत दि. २१/०१/२०२० रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त

महाराष्ट्र शासनाने अधिसूचना क्र. TPB 4315/167/CR-51/2015/UD-11, दि. २३/०५/२०१८ अन्वये म्हाडास विशेष नियोजन प्राधिकरण (SPA) म्हणून नियुक्त केले आहे. म्हाडाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नेमणूक करण्यामागचा हेतू म्हणजे गेली कित्येक वर्षे बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे मंजूरीसाठी प्रलंबित असलेले म्हाडाच्या विकास आराखड्यांस त्वरित मंजूरी मिळावी जेणेकरून मोडकळीस आलेल्या जीर्ण इमारतींच्या पुनर्विकासाची कामे वेगाने होऊन सदर इमारतीतील रहिवाशांना सामोरे जाव्या लागणाऱ्या समस्या कमी होतील. तथापि या कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, उपरोक्त अधिसूचना माहे मे २०१८ रोजी पारित झाली असूनही अद्यापपर्यंत अनेक अभिन्यासांना मंजूरी देण्यात आलेली नाही. सदर बाबतीत मा. मंत्री, गृहनिर्माण यांचे समवेत दि. २१/०१/२०२० रोजी झालेल्या बैठकीमध्ये मुद्दा उपस्थित करण्यात आला. याबाबत MCHI-CREDAI यांनी सादर केले की, म्हाडाने मुंबई मध्ये ५६ मोठया वसाहती विकसित केलेल्या आहेत. तथापि DCPR-२०३४ मधील आराखड्यानुसार अनेक वसाहतींचे अभिन्यास अद्याप सादर केलेले नाही. परिणामी अशा वसाहतींमधील संस्थांचा पुनर्विकास प्रलंबित आहे. सद्यस्थितीत म्हाडाकडे स्वतंत्र इमारत परवानगी कक्ष व स्वतंत्र अभिन्यास मंजूरी कक्ष असून सदर कक्षे बांधकाम परवानगी व अभिन्यासास मान्यता देण्याचे काम करत आहेत तसेच मुंबई मंडळातर्फे वसाहतींच्या पुनर्विकासासाठी ना-हरकत

प्रमाणपत्र देण्याचे काम केले जाते. परंतु बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे बांधकाम परवानगी व अभिन्यास मंजूरी ही दोन्ही कामे एकाच विभागामार्फत होतात. म्हाडामध्ये दोन स्वतंत्र कक्षांमध्ये समन्वय दिसून येत नसल्यामुळे मा. मंत्री महोदय यांनी बैठकीदरम्यान दिलेल्या आदेशानुसार ९० दिवसांऐवजी ४५ दिवसांमध्ये अभिन्यास मंजूरी देण्याबाबत आदेशित करण्यात येत आहे.

उपरोक्त बाबी व मागील दोन वर्षातील दोन्ही कक्षांच्या कामांचा अंदाज घेता अभिन्यास मंजूरी कक्ष व बांधकमा परवानगी कक्ष या दोन्ही कक्षांचे कामकाज फक्त बांधकाम परवानगी कक्षामार्फत हाताळण्यात यावे. यापूर्वी काढण्यात आलेले अभिन्यास मंजूरी कक्षाचे आदेश रद्द समजण्यात यावेत.

**उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण**

प्रत :

१. मुख्य अभियंता - १ / २ / ३ / प्रा.
२. मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ
३. मुख्य वास्तुशास्त्रज्ञ व रचनाकार / प्रा.
४. सहमुख्य अधिकारी, मुंबई मंडळ
५. उपमुख्य अभियंता, इमारत परवानगी कक्ष
६. नि.का.अ., मुंबई मंडळ
७. सचिव / प्राधिकरण